SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX - 2609000 Email – affiliationt1@unishivaji.ac.in
FAX : 0091-0231-2691533 & 0091-0231-2692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (संलग्नता विभाग - २६०९०८९, २६०९१३६)
फॅक्स : ००९१-०२३१-२६९१५३३, २६९३२९४ व २६९२३३३.

Estd: 1962
A++ Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

एसयु/संलग्नता/स्थान/टे.१/माने / 916 दिनांक 24 NOV 2022

प्रति,

मा. प्राचार्य / संचालक,
सर्व अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, शारीरिक शिक्षण,
शिक्षणशास्त्र, विधि, महाविद्यालये.

विषय:- कॅस अंतर्गत स्थान निश्चिती / पदोन्नती वेळी संस्था अध्यक्ष / प्रतिनिधी व प्राचार्य यांच्या उपस्थितीबाबत..

महोदय/महोदया,

महाविद्यालयीन शिक्षकांची ५ व्या, ६ व्या व ७ व्या वेतन आयोगानुसार **वरिष्ठ श्रेणी / स्टेज २ (AL ११), निवड श्रेणी /स्टेज ३ (AL १२), सहयोगी प्राध्यापक/स्टेज ४ (AL १३A) व प्राध्यापक / स्टेज ५ (AL १४) स्थाननिश्चिती** करण्यासाठी विद्यापीठामार्फत केंद्रिय पध्दतीने वेळोवेळी या कार्यालयाकडे जमा झालेल्या प्रस्तावांबाबत शिबिराचे आयोजन करण्यात येते.

शासनाने वेळोवेळी शासन निर्णयानुसार समित्यांचे गठण केलेले असून पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे कॅस अंतर्गत पदोन्नतीसाठी संस्था अध्यक्ष हे समितीचे अध्यक्ष असतात. तसेच सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक पदासाठीच्या कॅस अंतर्गत पदोन्नतीसाठीच्या निवड समितीचे संस्था अध्यक्ष हे अध्यक्ष असतात. तसेच सहाव्या व सातव्या वेतन आयोगाप्रमाणेगठीत केलेल्या स्टेज २ व स्टेज ३ साठीच्या स्थाननिश्चितीच्या स्क्रीनिंग समितीमध्ये प्राचार्य हे अध्यक्ष असतात.

विद्यापीठाकडून केंद्रीय पध्दतीने कॅस अंतर्गत स्थाननिश्चितीचे / मुलाखतींचे आयोजन केल्यानंतर कार्यालयाकडून वेळापत्रकाप्रमाणे शिबीराचे आयोजन केले जाते.तसेच संस्था अध्यक्ष व प्राचार्य यांना उपस्थित राहणेबाबत कळविले जाते.

तथापि असे निदर्शनास आले आहे की, महाविद्यालयाकडून काही शिक्षकांचे स्थाननिश्चितीचे/ पदोन्नतीचे प्रस्ताव या कार्यालयाकडे पाठविले जातात. परंतु स्थाननिश्चिती मुलाखतीवेळी संस्था अध्यक्ष / प्रतिनिधी तसेच प्राचार्य हे मुलाखतीसाठी उपस्थित रहात नाहीत. अशा वेळी मुलाखतीसाठी उपस्थित राहण्याऱ्या शिक्षकांना मानसिक व अर्थिक त्रास सहन करावा लागतो व संबंधित शिक्षक या कार्यालयाकडे पत्रव्यवहार करत राहातात.

याबाबत आदेशान्वये कळविण्यात येते की, संस्था अध्यक्ष किंवा प्राचार्य यांनी शिक्षकांचे कॅस अंतर्गत स्थाननिश्चिती / पदोन्नतीचे प्रस्ताव या कार्यालयाकडे त्यांच्या स्वाक्षरीसह पाठविल्यानंतर संस्था अध्यक्ष/ प्रतिनिधी व प्राचार्य यांना संबंधित शिक्षकांच्या कॅस अंतर्गत मुलाखतीच्या कार्यक्रमावेळी उपस्थित राहणे आवश्यक/ बंधनकारक आहे यांची नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,

एम. पी. कदम
उपकुलसचिव
संलग्नता विभाग